10712
06/12/12

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन)

समता. न्याय. बंधुता

कुलगुरु कार्यालय
पुणे विद्यापीठ
6388
3/12/2012
3/12/2012

जा.क्र. :

दिनांक :

जा.क्र. बार्टी/पुणे/शैक्षणिक संस्था/
२०१२-१३/9660
दिनांक : २६.११.२०१२

Inward No. 3993
Date 5/12/2012
BCUD
University of Pune

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
तंत्र शिक्षण व उच्च शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.

**विषय : पुणे विद्यापीठांतर्गत तसेच पुणे जिल्हयातील विनानुदानित व अनुदानित शैक्षणिक संस्थांनी / महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द न करण्याबाबत.....**

महोदय,

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय क्र.सीबीसी/२०१२/प्र.क्र.२१७/मावक, दिनांक २९ ऑगस्ट, २०१२ अन्वये राज्यातील अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जाती प्रमाणपत्र पडताळणीसाठी सामाजिक न्याय विभागाच्या नियंत्रणाखाली कार्यरत असलेल्या १५ विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांशी समन्वय साधणे, समित्यांनी साधलेल्या प्रगतीबाबत कामाचा आढावा घेणे, त्यांचेवर प्रभावी प्रशासकीय नियंत्रण ठेवणे, इत्यादि कामांसाठी " मुख्य समन्वयक, जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या " (Chief Co-ordinator, Caste Validity Scrutiny Committees) म्हणून महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना नियुक्त केले आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत असलेल्या विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडून मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे जातीचे दावे तपासून वैध असलेले प्रकरणी जात वैधता प्रमाणपत्र दिले जाते.

२. पुणे विद्यापीठांतर्गत तसेच पुणे जिल्हा स्तरावर असलेल्या विविध शैक्षणिक संस्थांकडून / महाविद्यालयांकडून मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र दि. ३० नोव्हेंबर, २०१२ पूर्वी संबंधित महाविद्यालयास सादर करावे अन्यथा विद्यार्थ्यांना हॉल तिकीट दिले जाणार नाही व परिक्षेस बसू दिले जाणार नाही अशी गेल्या ३/४ दिवसांपासून विविध महाविद्यालयात / व्यावसायिक शिक्षण देणा-या शैक्षणिक संस्थांत शिक्षण घेणा-या काही विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी या शैक्षणिक संस्थांकडून विद्यार्थ्यां विरुध्द होत असलेल्या कार्यवाहीबाबत मोठया प्रमाणात तक्रारी केल्या आहेत. या तक्रारींमध्ये प्रामुख्याने सदर शैक्षणिक संस्थांमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी दि. ३० नोव्हेंबर, २०१२ पर्यंत किंवा तत्पूर्वी जात वैधता प्रमाणपत्र

२८, क्विन्स गार्डन, पुणे - ४११००१, दुरध्वनी क्रमांक : ०२०-२६३६२०७६ / २६३३३५९५
Email directorbarti@gmail.com, bartipune@rediffmail.com ■ फॅक्स नं. ०२०-२६३३३५९६

सादर न केल्यास अशा विद्यार्थ्यांना परिक्षेसाठी हॉल जिकीट दिले जाणार नाही. मात्र परिक्षेस बसावयाचे असल्यास त्यांना अभ्यासक्रमाची संपूर्ण फी भरावी लागेल व तशी कार्यवाही ते करीत आहेत. त्यामूळे ख-या मागास वर्गीय विद्यार्थ्यांचा काहीही दोष नसताना त्यांना व त्यांच्या पालकांना प्रचंड मानसिक त्रास होत असून त्यांच्यामध्ये फार भीती पसरलेली आहे.

३. वरील नमूद सर्व प्रकारच्या तक्रारी हया अत्यंत गंभीर व चिंताजनक आहेत. सध्या विभागीय जात पडताळणी समिती, पुणे यांच्याकडे असलेल्या मोठया प्रमाणात प्रलंबित अर्जांपैकी बहुतांशी अर्ज तपासणी होऊन त्यांची वैधता प्रमाणपत्र वितरणाचे काम सुरु आहे. विद्यार्थी यांचे प्रकरणांना सर्वोच्च प्राधान्य देऊन उर्वरित प्रलंबित अर्जांची छाननी सुरु असून, त्यापैकी वैध दावा असणा-या विद्यार्थ्यांची वैधता प्रमाणपत्रे येत्या १५ ते २० दिवसांत समितीमार्फत निर्गमित करण्यांत येणार आहेत व यासाठी युध्द पातळीवर कार्यवाही सुरु आहे. तरी सर्व शैक्षणिक संस्थांना शासनाकडून तातडीने असे निर्देश देणे अत्यंत आवश्यक आहे की, ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत, त्या विद्यार्थ्यांचे प्रवेश पुढील १५ दिवसांपर्यंत रद्द करु नयेत व वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटी टाकून तसे लेखी विद्यार्थ्यांकडून घेऊन परिक्षेस बसण्यासाठी हॉल तिकिट घ्यावेत अन्यथा भविष्यात वैध ठरविल्या जाणा-या प्रकरणांमधील कोणताही विद्यार्थी परिक्षेपासून वंचित झाल्यास किंवा खुल्या वर्गाप्रमाणे सदर विद्यार्थ्यांकडून शुल्क वसूल केले तर त्यामुळे सदर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना झालेला / होणा-या अन्याय व नुकसानीबाबत संबंधित शैक्षणिक संस्थेला जबाबदार धरण्यांत येऊन कडक कार्यवाही करण्यांत येईल.

४. तरी शासनास आपणांस विनंती आहे की, याबाबत शासन स्तरावर संबंधित विद्यापीठ व महाविद्यालयांना सूचना निर्गमित करण्याची कार्यवाही कृपया सत्वर व्हावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

महासंचालक,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,
तथा
मुख्य समन्वयक,
विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती. म.रा.पुणे.

PGS/5645 Date: 28/12/2012

Copy for information & necessary action to :

1. The Principal of all Affiliated Colleges
2. The Director of all University Recognized Institutes
3. The Head of University Teaching Departments.

Ganeshkhind
Pune 411 007

Deputy Registrar
Admission